## प्रकरण चौथे

### मुक्ता सर्वगोड आणि त्यांचे सामाजिक कार्य ---

## प्रकरण - चार

### मुक्ता सर्वांगोड आणि त्यांचे सामाजिक कार्य ---

मुक्ता सर्वांगोड या दलित म्हणून जन्माला आलेल्या परंतु संस्काराने दलित नसणाऱ्या तसेच ज्यानी स्वतःची जातच सोडून दिली आहे अशा समाज सेविकेचे आत्मकथन म्हणजे मिटलेली कवाडे . दलित समाजाच्या परिवर्तनाची, समृध्दीची आणि लोकशाहीची मिटलेली कवाडे उघडण्याच्या हेतूनेच मुक्ताबाईनी समाज सेवेचे व्रत घेतले आणि ग्रामीण व शहरी जीवनात जमेल तसे कार्य केले. | केवळ हौस म्हणून हे कार्य करत असताना आपल्याच समाजातील स्वार्थाच्या चिखलात रुतलेल्या पुढाऱ्यांनी ' ही कॉंग्रेसची बाई आहे, वरच्या समाजातील बाई आहे ' असा धोबी शिक्का मारुन त्यांच्या समाज कार्यात विघ्ने आणण्याचा कसा प्रयत्न केला हे सर्व मुक्ताबाईनी प्रांजळपणाने मांडलेले आहे. आपल्या समाज कार्याबद्दलची भूमिका स्पष्ट करताना त्या म्हणतात, " मी समाज कार्य केले ते पुढारीपण मिळविण्यासाठी किंवा प्रदर्शनासाठी केलं नाही. मला कुणाकडे जाऊन गप्पागोष्टी करणं नटणं-मुरडणं याची आवड नव्हती. त्यामुळे मधला रिकामा वेळ आपण या गलिच्छ वस्तीत घालवू , त्यांना सरकारी योजना समजावून सांगू, असं खूप वाटे. केवळ या सरकारी सवलतींचा प्रचार करण्याच्या जिवापाड ओढीमुळे या समाज सेवेत मी गुंतत गेले. "[1] या अस्पृश्यवर्गाच्या विकासाचे सेवाभावी वृत्तीने कार्य करत असताना, त्यांच्यात सामाजिक परिवर्तन घडवून आणताना आपल्याच लोकांची गटबाजी , समाज नेतृत्वासाठी चाललेला संघर्ष पाहून त्यांचे मन व्यथित होते. अनेकवेळा मनात वैफल्याची जाणीवही निर्माण होते. पण हा मनाचा वैफल्यपणा बाजूला सारुन अगदी निष्ठेने समाज जागृतीचे कार्य पुढे चालू ठेवतात. तेव्हा हे कार्य करत असताना त्याना आलेले कडू-गोड अनुभव त्यांनी प्रस्तुत आत्मकथनामध्ये मांडलेले आहेत. त्यांच्या या कार्याकडे पाहून सौ.आरती कुलकर्णी म्हणतात, " मिटलेली कवाडे ' मध्ये लेखिका मुक्ता सर्वांगोड यांची भूमिका दलित मुक्ती करुन

इच्छिणाऱ्या समाज सेविकेची आहे." २ स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्यानंतरचा सर्व काळ या आत्मकथनामध्ये आला असल्यामुळे तत्कालीन समाज, इतिहास जाणून घेण्यासाठी याचा फार मोठा उपयोग होतो. त्याच बरोबर या कालखंडातील अस्पृश्यांच्या जीवनाचे दर्शनही यातून घडते. या दलितांच्या सामाजिक जीवनाचे दर्शन घडवितांना समाज सेवेचा चुकीचा दृष्टिकोन, समाज सेवेच्या खऱ्या गरजा आणि उणिवा त्यांनी वाचका समोर मांडल्या. हे सर्व करताना त्यांना आलेल्या अनुभवाकडे पाहता "दलित स्वकथनातील अनुभव हे दाहक जीवनानुभव असतात." ३ हे आरती कुलकर्णी यांचे मत पटण्यासारखे आहे.

१) बालपणीचे संस्कार ---

लेखिका मुक्ता सर्वगोड या लहानपणी पुणतांब्याला असताना शाळेत जाऊ लागल्या. केवळ अस्पृश्य जातीत जन्मल्यामुळे त्यांना जातीयतेचे चटके बसत होते. शाळेत बाईंनी त्यांना इतर मुलींपासून दूर बसविले. पाटी पुसण्याचे पाणीही एखादी मुलगी दुरूनच त्यांच्या पाटीवर शिंपडायची. यावेळी शिक्षणापासून वंचित असणाऱ्या संकुचित वृत्तीच्या स्त्रियांकडून मुक्ताबाई शाळेत जातात म्हणून उपेक्षा झाली. पण या सर्व गोष्टींकडे लक्ष न देता त्यांनी आपल्या शिक्षणाचा मार्ग सोडला नाही. दलित समाजाचे नेतृत्व करण्यासाठी व त्यांच्यात जनजागृती घडवून आणण्यासाठी डॉ. आंबेडकर त्यावेळी 'मूकनायक' व बहिष्कृत भारत' ही पत्रके काढत, ती पत्रके वाचून त्यातील बाबांच्या विचारांचाही त्यांना लाभ झाला. तर दलित समाजात पूर्वीपासूनच चालत आलेले दारिद्र्य व त्यांच्यावर होणारा अन्याय सांगून एक प्रकारे दलित जीवनाची त्यांच्या वडीलांनी मुक्ताबाईंना कल्पना दिली. शाळेत हरिजन मुला-मुलींना मिळणारी तुच्छ स्वरूपाची वागणूक सुध्दा ही मुक्ताबाईंच्या काळी कांही वेगळी नव्हती हे अस्पृश्य वर्गातील पुरूषांच्या चर्चे वरून, त्यांना कळून चुकले होते. मुक्ताबाईंच्या लहानपणाचा काळ हा अस्पृश्य वर्गाचा जनजागृतीचा काळ होता. या वर्गात जनजागृती करण्यासाठी त्यावेळी कोकणातील एक ब्राह्मण

प्रतिपालक बुवा आले होते. त्या कार्यक्रमात मुक्ताबाईंना दलित समाजाच्या व्यथा कळाल्या. आपला समाज तराळकी व म्हारकीच्या जाळ्यात कसा अडकला होता. सवर्ण त्यांच्याकडून बळजबरीने कसे काम करुन घेत होते, त्यांच्या नशिबी लाचारीचे जीवन कसे आले होते व हा समाज दिवसे दिवस अज्ञानामुळे गरिबीच्या खाईत कसा लोटला जात होता हे सर्व त्यांना समजून आले. एकंदरीत त्यांच्या लहानपणी वरील मार्गांनी मुक्ताबाईंच्या बालमनावर संस्कार घडले व त्यांना हरिजन समाजाची अवस्था कळाली.

२) <u>जयंती साजरी करणं, हारतुऱ्यांना खर्च करणं म्हणजे समाज कार्य नव्हे !</u>

मुक्ताबाईंचे लग्न होताच त्या मुंबईला स्थायिक झाल्या. एका स्त्रीच्या बोलावण्यावरुन त्या एका महिला मंडळाच्या सभेसाठी हजर झाल्या. त्यावेळी या महिला मंडळाचे मुख्य कार्य कोणते ? हे मुक्ताबाईंनी मंडळाच्या सेक्रेटरींना विचारताच त्या म्हणाल्या, "जयंती आली, साजरी करायची, बाबा आले, पुढारी आले, त्यांच्या स्वागतासाठी हारतुरे घेऊन जायचं. बाबांची सभा असली तर बायका काढायच्या. एकादीनं बारश्याचं निमंत्रण केलं तर वर्गणी काढून काही भांडकुंड न्यायचं"[4] तेव्हा मुक्ताबाईंनी आपले विचार प्रकट केले. त्या म्हणाल्या, "हे कार्य समाजाच्या एकीसाठी व ओळखी वाढविण्यासाठी ठिक आहे पण कार्यक्रमाच्यावेळी हार आणणे, बहुमान करणे हे त्यांनी मान्य नसल्याचे सांगितले. व म्हणाल्या "फक्त निव्वळ जयंती साजरी करणं आणि हारतुऱ्याना खर्च करणं एवढं म्हणजे समाज कार्य नव्हे !"[5] या वरपांगी असणाऱ्या समाज कार्यास विरोध करुन त्यानी खरे समाज कार्य कोणते ते सांगितले. या अस्पृश्य वर्गाचा सर्वतोपरी विकास होण्यासाठी त्यांनी साक्षरता वर्ग, मॉंटेसरी, शिवण कामाचे वर्ग व बी.डी.डी.चाळीत स्वच्छता करणे असे सुचविले. पण या महिला मंडळीतील कोंकणी स्त्रियांना खऱ्या समाज कार्याचा अर्थ कळला नसल्याने हा विचार त्यांना नवीन होता म्हणून त्यांनी प्रथम विरोध केला. पण देशावरच्या उदा. मानेबाई सारख्या स्त्रियांनी मुक्ताबाईंच्या या कार्यास पाठींबा

देण्याचे कबूल केले. त्यावेळेपासून मुक्ताबाईंनी आपल्या समाज कार्याची मुहूर्तमेढ रोवली.

मुक्ताबाईंनी नायगांवच्या बी.डी.डी. चाळी पासून आपले कार्य सुरु केले. तेथील लोकांचे बकाल जीवन पाहून त्या व्यथित झाल्या. या त्यांच्या कार्यास कोकणी स्त्रियांचा पाठींबा नव्हता. कम्युनिष्ट कार्यकर्ते श्री भोसले यांच्या पत्नी विमल भोसले व पार्शी कॉलनीतील अनुसया केदारी या देशावरच्या स्त्रियांच्या मदतीने त्या चाळीत हळदी कुंकवाचा प्रथम कार्यक्रम घेऊन आपल्या समाज कार्यास सुरुवात केली. तेरा नंबरमध्ये साक्षरतेचे वर्ग सुरु करण्यापूर्वी तेथील स्त्रियांच्या सुखदु:खाशी व जीवनाशी प्रथम त्या एकरुप झाल्या. नंतर त्यांना लागणाऱ्या पाट्या स्वत: मुक्ताबाई व त्यांच्या सहकारी केदारी यांनी स्वखर्चाने आणून दिल्या. नंतर वरळीच्या बी.डी.डी. चाळीमध्ये स्वत:च्या हिंमतीवर साक्षरतेचे वर्ग सुरु केले. बॉम्बे सेंट्रल कडे एक-दोन सभा घेऊन या महिलांच्यामध्ये एकी निर्माण करण्याचा व त्यांच्यात जागृति आणण्याचा प्रयत्न केला. आपल्या कार्याचा मुख्य उद्देश्य व्यक्त करतांना मुक्ताबाई म्हणतात, "येथील स्त्रियांच्यामध्ये जागृति निर्माण होऊन कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी प्रौढ वर्ग हे माध्यम होतं, ध्येय नव्हतं." [6] कारण याना बाबासाहेबांच्या आदेशानुसार सर्व प्रथम या वर्गात जागृति निर्माण करावयाची होती. त्यानंतर समाजाची सेवा. याच दरम्यान मुंबईत हिंदू-महार दंगे पेटले. सवर्ण गुंडानी अस्पृश्यांना छळण्यास सुरुवात केली. सर्वत्र भीतीची भावना निर्माण झाली. अस्पृश्यांना आपला प्राण वाचविणे मुष्किल झाले. त्यामुळे मुक्ताबाईंच्या पतीने आपली बदली इस्लामपूरला करुन घेतली. ओघानेच मुक्ताबाईंना मुंबईतील आपले समाज कार्य अर्ध्यावर सोडून इस्लामपूरला यावे लागले. इस्लामपूरला आल्यावर त्यांना एक वेगळाच अनुभव आला म्हणजे शहरापेक्षा या खेड्यात जातीयतेची बंधने फार कडक होती.याचा त्यांना प्रथम त्रास झाला.

१५ ऑगस्ट १९४७ ला भारत देशाला स्वातंत्र्य मिळाले. आपला आनंद व्यक्त करण्यासाठी सर्व थरातील नागरिकांनी अनेक ठिकाणी मिरवणुका काढल्या, झेन्डे फडकावले. पण गरीब अस्पृश्य मात्र भांबावून गेले होते. या वर्गाकडे पाहून

मुक्ताबाई अंतर्मुख होतात व म्हणतात, " देश स्वतंत्र झाला म्हणजे काय झालं याचा त्यांना पत्ताच नव्हता. रोजची मळ्यातळ्यातली रोजीच करायला होती. रोजचं लाचारीच जिणंच जगायला होतं. बायकोच्या अंगावर रोजच्या सारखीच आम्ही चिंधीच होती. रोजच्यासारखी मुलं नागडी होती, हातात शिळ्या भाकरीचा तुकडा घेऊन ! यात देश स्वतंत्र कुठं दिसत नव्हता. "[७] देश स्वतंत्र झाला म्हणजे नेमके काय झाले हे या अस्पृश्य, अडाणी समाजाला सांगण्यासाठी कुणाला सवड नव्हती. प्रत्येक जण आपल्याच आनंदात बेहोश होता. म्हणून मुक्ताबाई म्हणतात, " गांधीजी हे गांधी होते म्हणून भंगीवस्तीत मुक्काम करीत. हे का सारे गांधी आहेत म्हणून त्यांनी महारवाड्यांना मांगवाड्यांना भेटी द्यायला यावं ? "[८]

स्वातंत्र्य प्राप्ती होताच ठिकठिकाणी जाहिर सभा होऊ लागल्या. इस्लामपूरमध्ये अशाच जाहिर सभेसाठी नामदार यशवंतराव चव्हाण व श्री रामानंद भारती हे पुढारी आले होते. यांनी आपल्या भाषणात भारताला स्वराज्य अहिंसेने मिळालं, जगात असं कधीच झाल नाही वगैरे सांगून महात्मा गांधींची थोरवी गायिली. त्याचप्रमाणे आम्ही देशासाठी हे करु, ते करु, देशासाठी हे केलं ते केलं असे सांगत असताना मुक्ताबाईंना त्यांचे हे बोलणे रुचले नाही. यावेळी मुक्ताबाई आपल्या भाषणातून स्वराज्य हे अहिंसेने मिळालं नसून हत्याकांडातून रक्त सांडल्यावरच मिळालं आहे असे त्यांनी सांगितलं. पुढे अस्पृश्यांची कैफियत मांडत असताना म्हणाल्या, देशाला स्वातंत्र्य मिळालं म्हणजे नेमकं काय झाल हे गरीबांना माहित नाही. स्वातंत्र्य मिळाल असलंतरी या वर्गाच्या जगण्यात स्वतंत्रता अजून आलेली नाही हे पटवून देण्यासाठी त्या म्हणतात, " हरिजनांच्या पाण्याची साधी गोष्ट, पण तिच्याकडे लक्ष द्यायला कुणाला वेळ नाही. सार्वजनिक विहिरीवर बोर्ड असतो, ' ही विहीर सर्वांना खुली आहे. मामलेदार आपल्या वहीत नोंद करतात की, ' सार्वजनिक विहीरी सर्वांना खुल्या आहेत. ' पण हे महारमांग तासन्तास उभ्या उन्हात तडफडत असतात, घागरभर पाण्याची भीक कुणी घालील का म्हणून ". ' पण मुक्ताबाईंचे हे भाषण त्या पुढाऱ्यांना रुचले नाही असेही त्या सांगून जातात.

थोड्याच दिवसात महात्मा गांधींचा खून झाला. हा खून कोणाच्या हातून झाला हे प्रथम समजले नसल्याने मुसलमान वर्गात भीतीची भावना निर्माण झाली. तेव्हा मारेकरी हा ब्राह्मण होता हे लवकरच समजताच ब्राह्मण वर्गाची व्याकुळ अवस्था निर्माण झाली. सर्वत्र जाळपोळ होऊ लागली. ही सर्व अवस्था पाहून एका शोक सभेत भाषण करताना मुक्ताबाई म्हणाल्या, " आज तुम्ही सांगलीची मिल जाळली. धनी वेलणकरांची चूल लगेच बंद होणार काय ? पण त्या मिलमध्ये काम करणारे गोरगरिब कुठं जातील ? त्याना लगेच कुठे मिळेल रोजी ? रात्री पोरं ' आई भाकर ' म्हणून रडतील तेव्हा हे पेटविणारे धावणार आहेत का या सर्वांना तुकडा वाढायला ? असे बोलून लोकांच्या आंधळ्या स्वाभिमानावर प्रकाश टाकला व होणारी हिंसा टाळण्यासाठी त्यांनी लोकांना आपला विचार सांगितला.

देशाला स्वातंत्र्य मिळताच काळ बदलला. शेतीतील उत्पादन वाढविण्यासाठी सोसायट्या, खरेदी विक्री संघ, ग्रामीण बँका आपापल्या मगदुराप्रमाणे शेतकऱ्यांना मदत करु लागल्या. शेतीचा माल बाजारपेठात जाऊ लागल्याने तेथे सर्वांनाच कामाची हमी मिळू लागली. यांत्रिक युग आलं. या बदलेल्या परिस्थितीमुळे श्रमाला प्रतिष्ठा आली आणि मुंबईत खेड्यातून जाऊन स्थायिक होणाऱ्यांची संख्या वाढली. कामगारांचा तुटवडा भासू लागल्याने जातीयतेची बन्धने सैल होऊ लागली. या बदलामुळे अस्पृश्य वर्गाची आशा पालवली म्हणून गो.म. कुलकर्णी म्हणतात, " ज्या आंदोलित तरुणांना आजच्या यंत्र संस्कृतीने ' रुटिन:जंतू ' बनविले, त्याच यंत्र संस्कृतीने गावकुसाबाहेर राहणाऱ्या दलित समाजाला मुक्तीची नवी वाट दाखविली. त्यांच्या मनात नव्या आशा-आकांक्षा रुजविल्या. " १० त्या नंतर यातच कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पर्वतप्राय प्रयत्नाने व ब्रिटिशांच्या सान्निध्यामुळे दलिताना शिक्षणाची दारे खुली झाली. बाबासाहेबानी सरकारच्या मदतीने मागासवर्गीयांची एक बॅच उच्च शिक्षणासाठी परदेशी पाठविली. एकंदरीत वरील सर्व बदलामुळे अस्पृश्य वर्गाच्या प्रगतीस वाट मोकळी झाली.

मुक्ताबाई पाटणाला राहण्यासाठी आल्यावर त्यांना इस्लामपूरमधील आठवलेला प्रसंग येथे सांगतात, डॉ.आंबेडकर जयंतीच्या कार्यक्रमास आचार्य जावडेकर व श्री रानडे वकिल आले. त्यांनी आपल्या भाषणात बाबासाहेबांची स्तुती केली व म्हणाले कायद्याने सर्व अस्पृश्यांना सर्व हॉटेल उघडी केली आहेत व यापुढे अशीच सामाजिक सुधारणा होत राहील अशी त्यांनी खात्री व्यक्त केली. तेव्हा मुक्ताबाई आपल्या भाषणात म्हणाल्या, "आम्हाला मंदिर प्रवेश नको, अंत:करण प्रवेश पाहिजे"[११] याचे कारणही त्यानी त्याच वेळी पटकन सांगितले. पुढे हिंदूधर्माच्या मुळाशी रुजलेली ही जातीयता हजारो वर्षांपासून चालत आलेली आहे ती हळूहळू थांबेल असा प्रश्न मनाशी करून त्या पुढे म्हणाल्या, "कबूल, हजारो वर्षांपासून चालत आलंय, ते एकदम जाणार नाही, पण म्हणून त्याची शिक्षा आम्हाला का ? सरकारनं दहापाच गुन्ह्यात जबर शिक्षा ठोठावल्या म्हणजे कळेल किती उशीर लागतो ते ! समरी पॉवर असलेल्या कोर्टा पुढं तडकाफडकी अगदी जिथल्या-तिथं शिक्षा ठोठावल्या तर काय होईल ?"[१२] असा उपाय सुचवितात पण हे सरकारला करावयाचे नाही. आणि यामुळेच अस्पृश्य स्त्रीवर अनेक मार्गांनी कसा अन्याय होतो ते सांगून पुढे म्हणतात, "गांधीजींनी अहिंसेने आणलेलं हे असलं रामराज्य ! या रामराज्यात लव-अंकुश गल्लीगल्लीतून गुंडगिरी करताहेत, दारूभट्ट्या चालवताहेत. अन् या रामराज्यातील सीता ? ती तळपता सूर्य डोक्यावर,तळपती वाळू पायाखाली अशी एखाद्या घायाळ हरिणीसारखी निरन्न,निर्वस्त्र होऊन सैरभैर धावत आहे, लाज राखायला,त्या मायबाप सरकारमागे, मृगजळासारख्या ! आणि वर म्हणायचं हजारो वर्षांपासून चालत आलं आहे, हे सुधारायला थोडा वेळ लागेल."[१३] अशी वारंवार हरिजनांची कैफियत मांडून त्यावर उपायही योजण्याचे मार्ग दाखवून या वर्गाच्या उन्नतीसाठी सतत झटत असणाऱ्या मुक्ताबाई येथे पाहावयास मिळतात. यावरून मुक्ताबाई फक्त टीकाकार नसून समाज कार्यासाठी योग्य मार्ग सुचविणाऱ्या आहेत. लेखिका पाटणमध्ये असताना हरिजन सप्ताहाच्या कार्यक्रमासाठी फलटण चे राजे नाईक निंबाळकर व बाळासाहेब देसाई हे मंत्री हजर होते. त्यावेळी प्रमुख वक्त्या म्हणून लेखिका होत्या. यावेळी अस्पृश्य वर्गाची कैफियत मांडून त्यांची सुधारणा कशी करता येईल यावरही उपाय

सांगतात. त्या म्हणतात, "गांधीजी भंगी वस्तीत मुक्काम करीत. आजकालच्या मंत्र्यांनी या सप्ताहात एखादा दिवस हरिजन वस्तीत मुक्काम केल्यास त्या निमित्तानं गावातील लोकांची व सरकारी अधिकारी वर्गाची तिकडे येजा सुरु होईल."[१४] असा मंत्र्यांच्या कक्षेत असणारा जातीयता निर्मूलनाचा भाग सांगून सरकारने यासाठी काय करावे तेही सुचवून देतात. मुक्ताबाई म्हणतात, " असा प्रत्येक खात्याला बिनखात्याचा एक एक मंत्री नेमून दिला आहे तसाच एक बिन - खात्याचा मंत्री असावा, त्यानं गावोगाव फिरुन हरिजनांवर होणाऱ्या अत्याचाराकडे, अन्यायाकडे समक्ष लक्ष द्यावे. नोकरीच्या राखीव जागांचा कोटा भरला जातोय का नाही हे पाहावं. हरिजनांना दहशत दाखवतील किंवा वाळीत टाकतील त्याठिकाणी सामुदायिक दण्ड बसवावा. आणि हे सर्व उपकार म्हणून नव्हे तर मागासलेल्या समाजाला वर आणणं हे प्रत्येक सरकारचं कर्तव्यच असतं म्हणून."[१५] असे उपाय सुचवून अस्पृश्य वर्गाचे जीवन सुकर बनविण्याचा व जातीयतेची बन्धने नष्ट करण्याचा मुक्ताबाईंनी सतत प्रयत्न केलेला आहे.

पतीच्या बदलीमुळे मुक्ताबाई पाटणहून औंधला आल्या. आसपास राहणारा खेड्यातील कुणबी समाज जातपात मानत होता. यावेळी मुक्ताबाईंना शहर व खेडे यातील जातीपातीच्या संबंधात असणारा फरक जाणवला. पुढे सुरत राहण्यासाठी आल्यावर मात्र त्यांना असा विटाळ चांडाळाचा अनुभव इतका चटका बसण्या इतपत आला नसल्याचे त्या कबूल करतात. याचवेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या निधनाची वार्ता समजली. सर्व दलित समाज शोकाकूल झाला. शहरात मोठ्या पुढाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली शोकसभा झाल्या. आणि बाबासाहेबांच्या निधनानंतर महिला मंडळं व तरुणांची मंडळं याना उधाण आलं. पण हे फक्त शहरापुरतंच मर्यादित होतं.

पुण्यात प्रथम रास्तापेठ येथे महिला मंडळ स्थापन झाले. या मंडळाचा उद्देश्य होता की, डॉ.आंबेडकरांचा पुतळा उभा करण्यासाठी वर्गणी जमवणं. त्यानंतर प्रत्येक पेठेतून व चाळीतून महिला मंडळे स्थापन होऊ लागली. या

मंडळांच्या स्थापनेच्या कार्यक्रमासाठी अध्यक्षा म्हणून मुक्ताबाईंना निमंत्रण येई. पण वर्गणी काढून प्रमुख स्त्रिया, पुरुष,अनाहूत पाहुणे, गाणारे यांना हारतुरे खरेदी करणे व चहा-चिवड्यासाठी पैसे खर्च करणे या बाबींना मुक्ताबाईंचा प्रथमपासूनच विरोध होता. त्यातच या महिला मंडळांच्या स्थापनेसाठी उधाण आलेलं पाहून कांही पुरुष कार्यकर्ते अडाणी स्त्रियांच्या अडाणीपणाचा फायदा घेऊन त्यांच्याकडून नवीन मंडळ स्थापन करण्यासाठी वर्गणी काढत. एकदा मंडळ स्थापन झाले की सांगत, " आपले नेते अमुक अमुक यांना आणायचं आहे. आपली पार्टी जोरावर आहे. होऊन जाऊद्या सभा ." [१६] आणि या होणाऱ्या खर्चाची रक्कम मिळविण्यासाठी त्यातील कांही स्त्रियांना अध्यक्षपदाची लालूची दाखविली जाई. आंबेडकर किंवा गौतम बुध्दाच्या जयंतीच्यावेळी तर यांची वर्गणी जोरदार असे. तेव्हा मुक्ताबाई म्हणतात, " लोकांमधली स्वाभिमानाची, उत्साहाची ज्योत तेवत ठेवण्यासाठी असले कार्यक्रम आवश्यक असतात हे मान्य, परंतु या निमितानं येणाऱ्या पुढाऱ्याला स्पेशल कारनं आणणं ,त्याना भारी हॉटेलमध्ये ठेवणं, येणाऱ्या जाणाऱ्याची सरबराई करणं असलं सर्व कशा साठी ?" [१७] तेव्हा अशा वर्गण्या हे लोक बाबासाहेबांच्या विषयी वाटणाऱ्या सहानुभूतीपोटी देत पण समारंभसुख मात्र दुसरेच भोगत. त्यात कांबळे व गायकवाड असे गट निर्माण करुन भांडणे निर्माण केली जात असत. एवढेच नव्हे तर कांबळे गटाची नवरी व गायकवाड गटाचा नवरा यांच्यात कधी लग्न होत नसे. म्हणूनच मुक्ताबाई म्हणतात, " हजारो वर्षांपासून चालत असलेल्या जाती कमी पडत होत्या जणू म्हणून या दोन आणखी जाती या समाजानं स्वतःच्या हातानं निर्माण केल्या होत्या" [१८] वास्तविक अस्पृश्यांच्या सुधारणेसाठी चळवळींना पाठिंबा व्यक्त करुन या गरीबांचा विकास करता यावा हा उद्देश्य या मंडळ स्थापनेमागे होता. तेव्हा या प्रत्येक पुढाऱ्यांना आपणच या पक्षाचे किंवा मंडळाचे अनभिषिक्त राजे व्हावे ही मनीषा असे. म्हणून बन्धू माधव मोडक म्हणतात, " दलित चळवळीच्या आरंभी सर्व थरातील दलितांची भावना एक जुटीची, होती. पण पुढे मात्र राजकारणाच्या नागमोडी वळणांनी यात छेदाभेद निर्माण झाले. आंबेडकरांच्या

निधनानंतर निर्णयकी निर्माण झाली. त्यागा पेक्षा भोगाची चटक लागली."[१९] तेव्हा निरपेक्ष भावनेने समाज कार्य करणाऱ्या व पुढारीपणा मिरविण्याची इच्छा नसणाऱ्या मुक्ताबाईच्या विरोधी मात्र या सत्तेला हापापलेल्या पुरुषांनी खोटा प्रचार केला की, "ही बाई आपली नाही, वरच्या जातीतील आहे.

या पुढाऱ्यांच्या अफवेला न जुमानता मुक्ताबाईंनी रास्तापेठ येथील भोसल्यांच्या वाड्यात राहणाऱ्या महार कुटुंबात जाऊन महिला मंडळाची स्थापना केली. या स्त्रियांना मंडळाचे महत्व समजून देऊन त्यांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी रिकाम्या वेळेत द्रोण तयार करण्याची कल्पना सुचविली. येथील बऱ्याच स्त्रिया सुशिक्षित कुटुंबात वावरत होत्या त्यामुळे त्यांना ही कल्पना आवडली. यासाठी मुक्ताबाईंनी बळवंतराव टिळक यांच्याकडून २०० रुपये मदत आणून या स्त्रियांना दिली. त्यातून या स्त्रियांनी ऐंसी हजार द्रोण तयार केले. त्यावेळी बाहेर गावांहून पुण्यात द्रोण व पत्रावळ्या मागवल्या जात होत्या, तरी येथेच या तयार केल्यास या स्त्रियांना योग्य मोबदला मिळेल ही लेखिकेची अपेक्षा होती. हे द्रोण हरिजन स्त्रियांनी तयार केले आहेत असे खरेदी करण्यास आलेल्या व्यापाऱ्यास समजताच त्याने ते घेण्यास नकार दिला. त्यानंतर "संध्या"चे संपादक काणे यांच्या ओळखीने दुसऱ्या एका व्यापाऱ्याकडे गेल्यावर तो म्हणाला, "हे द्रोण हरिजन बायकांनी केलेले आहेत. हे लोकांना कळले तर कोणीही माल घेणार नाही. लहान द्रोण तर सत्यनारायणाच्या प्रसादासाठी वापरतात !"[२०] येथेही नकार मिळाल्याने नंतर स्मॉलस्केल इंडस्ट्रिजच्या ऑफिसमधील एका अधिकाऱ्याने खादी ग्रामोद्योग मंडळाशी संपर्क साधण्यास सांगताच पुन्हा धावाधाव करत मुक्ताबाई तेथे गेल्या. तेथेही इन्चार्ज म्हणून असणाऱ्या सावित्रीबाई मदन यांनी नकार दिला. तेव्हा हतबल होऊन मुक्ताबाई माघारी फिरल्या. केवळ जातीचा शिक्का पडल्यामुळे हे द्रोण कोणीच घेऊ शकले नाहीत. शेवटी हे सर्व द्रोण कचऱ्याच्या कुंडीत टाकून देणेत आले. मुक्ताबाईच्या कार्यात जातीच्या शिक्क्यामुळे असे संकट आले.

बाबासाहेबांच्या निधनानंतर अनेक मंडळे स्थापन होत होती. मुक्ताबाईंना या मंडळांच्या उद्घाटनासाठी निमंत्रण येताच त्या त्याना सांगत की, "महिला मंडळ स्थापून जयंती साजरी करायची आणि पुढाऱ्यांना हार घालून त्यांचा सत्कार करायचा एवढाचं कार्यक्रम असणाऱ्या मंडळाचे उद्घाटन मी करणार नाही. बालवाडी काढा, शिवणाला बायका जमवा, लिहावाचायला शिका, महिला मंडळात प्रौढ शिक्षण वर्ग चालू द्या."[२१] पण हे सर्व त्या स्त्रियांना नवीन वाटत होते. मंडळाचे खरे उद्दिष्ट काय हे त्यांना या आधी कोणी समजूनच सांगितलेले नव्हते. मुक्ताबाईंच्या मते जयंती उत्सवापेक्षा यांच्या सुधारण्याचा प्रश्न महत्वाचा होता. पण त्यांच्या या विचारसरणीला वेगळेच फळ आल्याचे त्या सांगतात की, "मी कॉंग्रेसची आहे, वरच्या जातीची आहे, कॉंग्रेसने पैसे देऊन मला संघटना फोडायला पाठविली आहे," अशा अफवा उठविल्या !"[२२] तेव्हा जयंतराव टिळकांनी सेवाभावी वृत्तीने दिलेल्या मदतीसही यांनी वाईटच वळण लावून यांच्या कार्यात अडचणी निर्माण केल्या.

नंतर रा.तु.नाईकांच्या चाळीत मुक्ताबाईंनी बालवाडीचा वर्ग सुरु केला. वाय.एम.सी.कडून मदत घेऊन दूध केन्द्र काढले व लहान मुलांना त्याचा फायदा करुन दिला. वाय.एम.सी.चे सेक्रेटरी मिस्टर आयमेन व त्यांच्या पत्नी यांच्या मदतीने चिखलवाडीतील मुलांसाठी क्रिडाकेन्द्र काढले, त्यांच्यात खेळाच्या सहाय्याने उत्साह निर्माण केला. तिथल्याच दोन मुलांची मदत घेऊन सोशल वेल्फेअर, स्मॉल स्केल इंडस्ट्रिज आणि शेतकी या खात्यांच्या कडून मिळणाऱ्या सवलती, शिक्षणकेन्द्र, कर्ज पध्दती, ऑफिसांचे पत्ते यांचा तेथील लोकांना लाभ व्हावा म्हणून सुंदर हस्ताक्षरात तक्त्यावर लिहून घेतले. आणखीन कांही विद्यार्थ्यांच मंडळ होतं, त्यांच्याकडून चित्रं जमवून त्याचं प्रदर्शन भरवलं. या चित्रात मुक्ताबाईंना अजिंठ्याची प्रतिकृती दिसून आल्याने त्यांनी स्मॉलस्केल इंडस्ट्रिजच्या डायरेक्टराना भेटून या चित्रा बरोबरच त्यांच्या लघुउद्योगाची व कुटिरोद्योगाची सर्व यंत्रे या प्रदर्शनात ठेवण्याचा निर्णय घेतला. डायरेक्टरांनी तशी परवानगीसुध्दा दिली. हे प्रदर्शन भरविण्याचा लेखिकेचा मुळ उद्देश्य असा होता की, झोपडपट्टीतील या

लोकांना या प्रदर्शनाचा लाभ व्हावा व त्यांच्यातील शिकलेल्या मुलांना नोकरी ऐवजी एखादा खाजगी धन्दा काढण्यासाठी प्रेरणा मिळावी. या प्रदर्शनाच्या कार्यक्रमासाठी शिक्षण खात्याचे डायरेक्टर आप्पासाहेब पवार आले होते. त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "तुम्ही आलेली संधी दवडू नका. सरकारनं तुमच्यासाठी जे जे वाढून ठेवलं आहे, त्याचा फायदा घ्या."[२३] असे सांगून मुक्ताबाईंनी हे प्रदर्शन भरविल्यामुळे त्यांचे कौतुक केले. आणि आपल्याकडून कांही मदत लागली तर ती खुषीने करण्याची त्यांनी कबुली दिली. हे प्रदर्शन पाहण्यासाठी आसपासच्या भागातून बरेच नागरिक आले होते. याचा शेवटी परिणाम चांगलाच झाला. अर्धवट शाळा सोडून भटकणाऱ्या मुलांनी इंजिनिअरिंगमध्ये टर्नरसाठी नावं नोंदविली तर कांही जण खाजगीमध्ये शिकावू म्हणून काम करू लागले. मुक्ताबाई म्हणतात, "एवढं करून बक्षिस काय ? तर ही बाई कॉंग्रेसची आहे. तिला आपल्यात काम करू देऊ नका, ती आपली नाही, हा प्रचार !"[२४]

या प्रदर्शनाच्यावेळी पुढाऱ्यांच्याकडून झालेल्या उपेक्षेमुळे मुक्ताबाईंना १९४५ च्या सुमारचा एक प्रसंग आठवला तो येथे त्या सांगतात, त्यावेळी "बिर्ला हाऊस" असं नाव देऊन महात्मा गांधींच्या सामुदायिक प्रार्थनेच्या बातम्या वर्तमानपत्रातून येत. ही प्रार्थना व महात्मा गांधी यांना पाहण्यासाठी एकदा मुक्ताबाई गेल्या. तेथे महात्मा गांधीना हरिजनांच्या विषयी व बाबांच्याविषयी कांही प्रश्न विचारून त्या परत आल्या. लगेच दुसऱ्या दिवशी मराठी-इंग्रजी - गुजराथी या सर्व पेपरमध्ये ही बातमी छापून आली. त्यामुळे परळच्या बी.आर.टी.चाळीतील सर्व महिला एकत्र जमून याविषयी अध्यक्षबाईंच्या घरी गेल्या. आणि यांनी ठरविले की, " ही बाई दखनी ,आपल्या बळीची नाय, पेपरात आलंय ती गांधीला भेटून आली तरी आता रविवारी मिटींग घ्या व बाबा दिल्लीहून आले की त्यांच्या कानावर ही गोष्ट गेली पाहिजे. म्हणतात की ही कॉंग्रेसची बाई आहे. आपल्या पक्षात मुद्दाम शिरतीया स्पायडी सारखी ! आणि शेवटी त्यानी ही गोष्ट बाबांच्या कानावर घातली. पण बाबांनी त्याना

समर्पक उत्तर दिले की, "ती उत्सुकता म्हणून गेली होती. शिवाय ती बाई हुशार वाटली."[२५] तेव्हा या स्त्रियांच्या 'कॉंग्रेसची बाई या धोबी शिक्याला न जुमानता मुक्ताबाईंनी एका विधायक कार्याचा आराखडा तयार केला आणि बाबा आले की त्यांच्या उपस्थितीत या कार्याची मुहूर्त मेढ रोवण्याचं ठरलं. एके दिवशी बॉम्बे सेंट्रलवर बाबांची मुलाखत घेण्यासाठी बाबा बसलेल्या रेल्वेच्या डब्यात लेखिका गेल्या. त्या डब्यात उगाच बसून राहिलेल्या माणसांनी लगेच वाऱ्यासारखी बातमी पसरविली की, बाबांची मुलाखत या बाईंनी घेतली असून ती पेपरात छापायला त्यांनी परवानगी दिली आहे. यामुळे दुसऱ्या दिवशीपासून बायकांच्यामध्ये कुजबुज सुरु झाली. त्यांच्या परवानगी - शिवाय बाबांना भेटल्याबद्दल मुक्ताबाईंना माफी मागायला लावायचं असं त्यांनी ठरवलं. तेव्हा मुक्ताबाई म्हणतात, "मी ही त्यांना ठणकावून सांगितलं, " बाबाना भेटण्याच्या बाबतीत प्रत्येकजण स्वतंत्र आहे. त्यानीच ठरवायचं की कुणाला भेट द्यायची आणि कुणाला नाही ते त्यांनी मला भेट दिली त्या अर्थी माझं कांही चुकलं नाही. मी स्वतंत्र आहे. कोकणी दखनी हा भेद बाबांचा नाही/ हे मला माहित आहे." [२६] अशी अनेक लेबले लावून या स्त्रियांनी मुक्ताबाईंना छळण्याचा प्रयत्न केला. तेव्हा मुक्ताबाई म्हणतात, "या लोकांनी इथे, कॉंग्रेसची बाई' असं हत्यार न वापरता कोकणी - दखनी असं हत्यार वापरुन एक प्रकारची कवाडं मिटविण्याचा प्रयत्न केला." [२७] पण या सर्व आपत्तींना तोंड देऊन आपले कार्य जिद्दीने करण्याचा निर्णय मुक्ताबाईंनी घेतला.

या दृढनिश्चयानेच चिखलवाडी येथे त्यांनी भारत सेवक समाजामार्फत श्रमदान शिबिर घेण्याचं ठरवलं. तेथे पडीक स्वरुपामध्ये असणाऱ्या सार्वजनिक जागेत सर्वांच्या उपयोगासाठी दोन खोल्या बांधण्याचं ठरवलं. तेथील लोकांना ही योजना समजावून सांगितली व काम करणाऱ्या मुलांना प्रत्येकाने एकेक दिवस मोफत वाढून त्याचे पैसे मिळावे अशी पावती द्यायची व त्या पैशातून लागणाऱ्या विटा आणणाऱ्यांच्या व गवंड्यांच्या पगार द्यायचा असे ठरवलं. ही योजना तेथील लोकांना आवडली. त्या जागेचा सातबाराचा उतारा काढून नगरपालिकेतून

बांधकामास परवानगी आणली. तेव्हा या शिबिराच उद्घाटन उद्या आहे तर आदल्या दिवसी तेथील नगर सेवकाने काही पुरुषांना शिकवून ही जागा देण्यासाठी विरोध करावयास लावला. हे लोक दारू पिऊन तर्र होते. ते म्हणाले, "बाई उद्याचा कार्यक्रम रद्द करा. जागा द्यायची नाही !"[२८] तेव्हा या लोकांना असे शिकवणारा नगरसेवक दररोज बुध्दवंदना घेणारा होता. म्हणून मुक्ताबाई म्हणतात, "बुध्दवंदना घेणारे एकजात सारे पुढारीच ! त्यांच्या पुढारपणाला पुढच्या पिढीनं ठोकरलं असतं म्हणून ही माघार !"[२९] तरी आपल्याच जातीतील सत्तेच्या लोभाने बरबटलेले पुढारी या समाज कार्यामध्ये अशा वारंवार अडचणी निर्माण करुन या वर्गाला स्वतःच्या कह्यात ठेवण्याचा प्रयत्न करीत होते तरी या लोकांच्या वृत्ती-प्रवृत्तीवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न मुक्ताबाईंनी केला आहे. म्हणूनच आरती कुसरे-कुलकर्णी म्हणतात, "या समाजात दलित समाजाचे नेतृत्व करणाऱ्या मंडळींनी समाज कार्य कसे चिखलात रुतविले आहे याचाही वेध घेण्याचा प्रयत्न त्यांनी केलेला आहे."[30] तेव्हा मुक्ताबाईंच्या या बहुजनहिताय बहुजनसुखाय अशा कामाला विरोध झाला पण त्यांनी हे शिबिर न बदलता पुणे-मुंबई रस्त्याला जोडणारा पोच्टा जवळचा दोन-तीन फर्लांगाचा रस्ता दुरुस्त करुन घेतला. पुढची पिढी नक्कीच सुधारेल अशी आशा प्रकट करुन व आपली जिद्द न सोडता मुक्ताबाईंनी मंगळवार गाडीतळावर एक संस्कार केन्द्र सुरु करण्याच ठरवलं व त्या तयारीस लागल्या.

येथील झोपडपट्टीतील लोक बकाल स्वरुपाचे जीवन जगत होते. बैल - गाडीच्या आत जेवढी जागा असते तेवढ्या आकाराच्या झोपडीत राहणारी ही माणसे फाटक्या कुटक्या तरटाचा व गंजलेल्या पत्र्याचा छपरासाठी उपयोग करुन तरटाने बनविलेल्या भिंतीच्या झोपडीत व काळ्या गाळाने रबरबलेल्या अशा ठिकाणी राहात होते. या जागेच भुईभाडे महिन्याला पाच रुपये देत होते. तेव्हा या बकाल वस्तीतील जीवनाकडे पाहून मुक्ताबाई म्हणतात, "या अशा वस्तीत पहिली गरज असते अन्न-वस्त्र-निवारा यांची. नंतरच साक्षरता, संस्कार वगैरे !"[३१] या वस्तीत डबा विकणाऱ्या, श्रीमंतांना शिळ्यापाक्या अन्नाच्या आशेने शेण पुरविणाऱ्या, कागद, बिळे, तारा, पत्र्याचे तुकडे व चिंध्या वेचणाऱ्या स्त्रिया

राहात होत्या. त्याच बरोबर कांहीही काम न करता पत्ते खेळणारे, हातभट्टीची दारु पोचवणारे, एखाद्या दादाच्या धंद्यात बकरे बनणारे पुरुषही होते. अशा या सर्वसामान्य जगाशी नाळ तोडलेल्या बकाल वस्तीमध्ये संस्कार केन्द्राची नितांत गरज असल्याची मुक्ताबाईंनी ओळखले होते.

आंबेडकर जयंतीचा मोका साधून खड्याच्या चाळीतील निमंत्रण स्वीकारुन मुक्ताबाई तेथे गेल्या. तेथून मंगळवार गाडीतळाजवळच होता. त्यांच्या झोपडीचे मालक त्यांच्यापैकीच एक होते. त्यास बोलावून आणले. हे तेथील नगरसेवक होते. यावेळी आपल्या भाषणातून या मंगळवार पेठ गाडीतळातील लोकांचे दु:ख व त्यांची असणारी गैरसोय मांडून त्या बकाल वस्तीची सुधारणा करण्यासाठी त्यांनी नगरसेवकास सांगितले. त्या नगरसेवकाच्या वृत्तीचे वाभाडे काढले. त्या म्हणाल्या, " ज्यांच्या जीवावर कमवता त्यांच्यासाठी हे कामं तर करीत नाहीतच उलट त्याचा त्यांना आनंद आहे ! ज्या माणसांसाठी आपलं सारं आयुष्य बाबासाहेबांनी वेचलं ती माणसं हीच. ज्यानी माणुसकीच्या लढ्यासाठी काळाराम मंदिर सत्याग्रहात आपल्या जीवाचा गोवर्धन केला ती माणसं हीच ! काँग्रेसच्या मंत्री मंडळात दाखल होताना ज्या समाजाला बाबानी आश्वासन दिलं होतं की, " ज्या दिवशी ही खुर्ची माझ्या समाजाच्या हिताच्या आड येईल त्या दिवशी ती मी झुगारुन देईन " तो समाज याच माणसांचा ! आणि शेवटी मला म्हणायचंय की, बाबांच्याच प्रयत्नानी समाजाच्या सेवेसाठी मानाच्या जागा ठायी ठायी निर्माण झाल्या, त्या जागांवर वाघाची झूल घेतलेल्या कुत्र्याना नेऊन बसवणारी माणसं ती हीच ! "[32] असे या अस्पृश्य वर्गातील पुढारीपणा करणाऱ्या लोकांच्या वृत्तीवर प्रकाश टाकून स्वत:चा खितपत पडलेला समाज त्याना दाखवून देऊन त्याचा विकास करण्यासाठी सुचविले व पुढे म्हणाल्या या नगरसेवकास स्वत:च्या खर्चाने या झोपडपट्टीतील सोय करायची नसेल तर तुम्ही नगरसेवक आहात, तेथे शब्द टाका, खेटे घाला आणि ही नरकपुरी सुधारण्याचा प्रयत्न करा. आणि शेवटी आपल्या मनातील क्रोध व्यक्त करुन म्हणतात, " आज ना उद्या काळ बदलेल आणि ही झोपडपट्टी पेट घेऊन उठेल ! तुमच्या सतरा पिढ्याही वर उठू शकणार नाहीत,

तसं झालं तर ! काळाच्या खुणा हेच सांगतात." [33] पण एवढे सांगूनही त्या नगरसेवकाने कांहीही केले नसल्याचे लेखिका सांगतात. तेथे लेखिकेस हेच सांगावयाचे आहे की,या अडाणी समाजास याच समाजातील लोक स्वत:च्या बाहूपाशाखाली ठेवण्याचा प्रयत्न करतात. त्याचप्रमाणे ब-याच दलित साहित्यिकांच्या साहित्यातून फक्त सवर्णच अस्पृश्यावर अन्याय करतात असा सूर दिसतो. तर मुक्ताबाईंनी येथे सवर्णा बरोबरच आपल्याच जातीतील स्वार्थाच्या गर्तेत बुडविलेले लोकसुध्दा कांही वेळा या अस्पृश्यांच्या दु:खास कारणीभूत ठरतात हे पटवून दिले आहे.

नंतर मुक्ताबाईंनी आपला मोहरा त्याच भागातील कसबा पेठ वॉटर पंपिंग स्टेशन समोर राहणा-या झाडूकामगार भंगी वस्तीकडे वळवला.तेथील विष्णूजी व त्याची पत्नी यांच्या मदतीने तेथील स्त्रियांशी संबंध साधून तेथे शिवणाचे वर्ग सुरु केले. येथे वेगवेगळ्या जातीतील बि-हाडे राहात होती. ते स्वच्छतेने राहात व पेहरावही त्यांचा चांगला असल्याचे लेखिका सांगतात,वस्तीच्या सुरुवातीसच असणा-या गुरुनानकाचा फोटो पुजलेल्या देवळात पार्टीशन मारुन येथे शिवणाचे काम, साक्षरता वर्ग, बालवाडी असे वर्ग सुरु केले. अगदी कमी मोबदल्यात इंदूताई टिळकांच्या ओळखीच्या मुली येथे शिकवण्यास येत. याच वस्तीतील तिघे-चौघे पुरुष मनोभावे मदत करत. लेखिकेस इतर ठिकाणी जसा कटु अनुभव आला तसा येथे आला नसल्याचे सांगतात. देवळाला लागून तालीम असल्याने कोणाच्या तरी सांगण्यावरुन तेथे वर्ग भरवण्यास नकार मिळताच विष्णूजीने स्वत:ची एक खोली या शिवणवर्गासाठी दिली.भंगी वस्तीतील या संस्कार केन्द्रास स्पेशल केस म्हणून समाज कल्याण खात्याकडून परवानगी आणली. पुरुषांच्या मागणीप्रमाणे त्याना करमणुकीचे साहित्य व मुलांना पुस्तके आणली. त्याच बरोबर शिवण व भरतकामासाठी लागणारे साहित्यही आणले. येथे हे संस्कार केन्द्र व्यवस्थित सुरु झाले पण अशा संस्कार केन्द्राची नितांत गरज गाडीतळ ,झोपडपट्टीसाठीही आहे असे लेखिकेस वाटत होते. या गाडीतळातील स्त्रिया घाण घाण शिव्या देत.रस्त्यावरच उवा मारत बसत.त्यांच्या बसण्याला मर्यादा नसे किंवा त्याना त्यात लज्जास्पद असे कांहीही वाटत नसे. या लोकांच्या

अशा वागण्याकडे पाहून मुक्ताबाई म्हणतात, " मला कधी कधी शंका येई - या अशा वागण्यामुळेच या जातीची हेटाळणी करण्यात कुणालाही कांहीही दिक्कत वाटत नसावी.।" [३४]

या झाडू कामगार स्त्रियांच्या झाडूकामाला प्रतिष्ठा मिळवून देण्याचाही विचार लेखिकेच्या मनात आला. केवळ झाडूवाली म्हणून तिच्या पदरी तुच्छता येऊ नये असे त्याना वाटत होते. यांच्या कामाच्या जाहिराती निघाल्याने ज्याना नोकरी मिळत नाही ते सुध्दा या कामासाठी अर्ज करतील. यामुळे या कामाकडे बघण्याचा लोकांचा दृष्टीकोनही बदलेल. कारण झाडूवाली निवृत्त झाली किंवा मयत पावली तर तिची मुलगी किंवा सून तिच्या जागी कामाला लागते.आणि ही अशी परंपराच होऊन बसते. या गाडीतळावर येथील लोकांना सुधारण्यासाठी लेखिकेने साक्षरता वर्ग काढला पण तेथील पुरुष वर्ग व पुढारी यांच्या विरोधामुळे त्याना तो बंद करावा लागला.

याच दरम्यान आमदार मालतीबाई शिरोळे यांच्या मदतीने पऱ्याच्या चाळीत दारुबंदी सप्ताहाचा कार्यक्रम घडवून आणला. त्यासाठी तेथील मुलांचा उपयोग करुन घेतला. वारंवार मुक्ताबाईच्या कार्यास विरोध करणारी मंडळीसुध्दा येथे हजर होती. पण हा दारुबंदीचा कार्यक्रम पाहून येथे काही आपल्या वर्चस मांडवल मिळत नाही असे समजून परत गेली.

समाज सुधारणा व्हावी ही हौस मनी असणाऱ्या मुक्ताबाईंनी गुरुवर्य बाबूराव जगताप यांच्या मदतीने प्रौढ शिक्षणाच्या वर्गासाठी रास्तापेठ, चिखलवाडी,बोपोडी,दापोडी, सदुयाची चाळ,गाडीतळ झोपडपट्टी,अहिल्याश्रम, मंगळवार पेठ, श्रमिक नगर ,मंगीवस्ती या ठिकाणी बालवाडी, शिवण वर्ग, क्रिडा केन्द्र, महिला मंडळ, लघु उद्योग,वाचनालय,भजनी मंडळ, दूध केन्द्र,वर्ग सुरु केले.या साठी कमी पगारात सेवा करणारी माणसेही त्याना मिळाली. नियमात बसेल त्याप्रमाणे समाज कल्याण खाते, केन्द्रिय समाज कल्याण निधी,कुटिरोद्योग, किंवा लघु उद्योग खात अल्प-स्वल्प मदत करीत होते. या बकाल वस्त्यांचा विकास होण्यासाठी मुक्ताबाई जिवापाड धडपडत होत्या.

एकदा बाबा आढाव, सौ. अनुताई लिमये, आबाबेन देशपांडे व विमल गरुड यांच्या पुढाकारांने 'गलिच्छ वस्ती निर्मूलन' या योजनेवर एक सभा आयोजित केली. अध्यक्षस्थानी सुप्रसिध्द अर्थतज्ञ धनंजय गाडगीळ होते. तर खासदार म्हणून इंदिराबाई मायदेव उपस्थित होत्या. इंदिराबाई मायदेव आपल्या भाषणात म्हणाल्या, महिला मंडळातर्फे गलिच्छ वस्ती निर्मूलनाचे कार्य करु हे ऐकताच मुक्ताबाईंनी आपल्या भाषणात हा त्यांचा मुद्दा खोडून काढला व म्हणाल्या, प्रांतीय सरकार किंवा केन्द्रिय सरकार सुध्दा या अवाढव्य प्रश्नाला पुरे पडणार नाही. कारण केन्द्रिय सरकार जेव्हा मदत देते तेव्हाच राज्य सरकार इकडे खर्च करते. तरी महानगरपालिकेने जसा शिक्षणासाठी कर बसविला आहे तसाच गलिच्छ वस्ती निर्मूलनासाठी बसवावा. आणि या लोकासाठी बांधली जाणारी घरे सुध्दा पुरेशी व शहराच्या जवळ असावीत. कारण यांचे उद्योग शहरातच आहेत. यांना बसभाडे परवडणार नाही. असा गलिच्छ वस्ती निर्मूलनाचा मार्ग सांगून पुढे म्हणतात, "हे लक्षात न घेता शहरापासून दूर घरे बांधल्यास ती ते दुसऱ्याना देऊन शहरात पुन्हा दुसरी झोपडपट्टी उभी करतील." [35] या झोपडपट्टीत चूकीचे समाज कार्य कसे केले जाते ते पटवून देण्यासाठी दिवाळीच्या वेळी झोपडपट्टीत फुकट वाटल्या जाणाऱ्या डालड्याच्या डब्याचे उदाहरण देतात. त्या म्हणतात, "जेथे दिव्याला रॉकेल नसणार, पणतीला गोडेतेल दूरच । अशा जागी काय उपयोग त्या मदतीचा ? त्या फुकट डालड्याचा ? काय द्यायच त्याचं भान ठेवणं जरुर आहे." [36] अशी समाजसुधारणेची योग्य दिशा त्यांनी दाखवून देण्याचा प्रयत्न केला. मुक्ताबाईंच्या कार्यास यानंतर बहर येऊ लागला. पण यापूर्वी अनेक पुढाऱ्यांनी व महिला मंडळातील स्त्रियांनी विरोध करुन यांच्या कार्यात अडचणी निर्माण केल्या. कांही त्यांच्या योजना बंद पाडल्या. तेव्हा स्वतःच्या कार्यात मनासारखं दान पदरात पडतं नसलेलं पाहून मुक्ताबाई म्हणतात, "महाभारतातल्या कवड्या जरासंधाच्या हाडाच्या होत्या, त्यांचा थरकाप होई पण या ? या कवड्या हावऱ्यापोटी नासल्या प्रवृत्तीच्या कवड्या होत्या !" [37]

मुक्ताबाई रहात होत्या तेथे हरिजनच नव्हे तर तेली, तांबोळी, कुणबी,

न्हावी अशा सर्व लोकाबरोबरच तिथे राहणारे मराठेही होते. या मराठ्यांची मुलं अर्धवट शाळा सोडून फिरत होती. या वेळी किर्लोस्कर,कूपर,बजाज,महिंद्र या कारखान्यातून स्पेअर पार्टस बाहेर छोट्या मोठ्या वर्कशॉपमध्ये देण्याची पद्धत असल्याने होती. त्यामुळे गल्लीबोळात स्पेअर पार्टस तयार करणारे वर्कशॉपस् निघत होते. या परिस्थितीचा फायदा घ्यायचा असे मुक्ताबाईंनी ठरविले.त्यानी उद्योगमंत्री स.गो.बर्वेसाहेब यांची भेट घेऊन एक गणेश लेथ,एक ग्राइंडर ,एक ड्रिलींग मशिन व छोटी मोठी हत्यारे त्यांच्याकडून घेण्याचे ठरविले. त्यांची भेट घेताच त्यांनी हे सर्व देण्याचे कबूल केले. या सोबतच या कार्यक्रमास हजर राहण्याचे त्यांच्याकडून कबूल करून घेतले पण थोड्याच दिवसात बर्वे साहेबांची दिल्लीला बदली झाली.उपमंत्री जी.डी.पाटील यांच्यावर या कार्यक्रमाचं काम त्यानी सोपवलं.कार्पोरेशन आरोग्य खात्याचे प्रमुख डॉ. ग्रेशास यांनी आपल्या अधिकारात जागा देण्याचे कबूल केले. पण हुकूमाची अंमलबजावणी करणाऱ्या नोकराने मुख्य हॉल न देता पुराच्या पाण्याची दिशा असणारा व्हरांडा दिला गेल्याने हे काम नाईलाजाने बंद करणे भाग पडले. केवळ गरिबांचा विकास व्हावा,सरकारी मदतीने का होईना यांच्या जीवनाचा विकास घडवून आणावा या एकमेव इच्छेने चालविलेल्या कामात कोणत्या ना कोणत्या रुपाने अशा अडचणी येत होत्या. पण या मुक्ताबाईंनी चालविलेल्या कार्याची खातरजमा याच अस्पृश्य वर्गातील लोकांना नव्हती म्हणून मुक्ताबाई येथे आपल्या मनाची खंत व्यक्त करतात की, " ज्या समाजासाठी एवढी खटपट मी करत होते त्यालाही कुठे पर्वा होती ? त्यांच्या अगदी दारात, म्हणजे भीमनगरच्या प्रवेशमार्गात सभा झाली असता कुणीही काय चाललंय म्हणून डोकावलंही नाही ! एरवी मोहरम असो नाही तर मरीआईची मिरवणूक असो, तुटून पडत सारे, पण या सभेला कोणीही आलं नाही. "[३८] असा या अस्पृश्य वर्गातील लोकांच्या प्रवृत्तीवर प्रकाश टाकला आहे.

असाच एक दुसरा प्रसंग सांगतात, समाज कल्याण खाते रोज भाजीपाला फळं वगैरे विकणाऱ्यांना कमीत कमी शंभर रुपये मदत म्हणून वाटणार होते असे मुक्ताबाईंना समजताच त्यानी ही बातमी रस्त्यावर बसून कांही बाही विकणाऱ्या दोघी तिघींना सांगितली असता त्यानी " बरं बघू " असे निर्विकारपणे

उत्तर दिले. कारण त्यांचा कोणी पुढारी भेटल्याशिवाय त्याना काही करता येत नव्हतं. तरी या स्त्रियांच्या व पुढा-यांच्या प्रवृत्तीकडे पाहून मुक्ताबाई म्हणतात, " असली आपल्याच पंखाखाली अडाणी लोकांना ठेवण्याची प्रवृत्ती पुढा-यांनी जाणूनबुजून पोसलेली आहे. कपाळकरंट्यानो,तोपर्यन्त सुधारणा कुठली ? " [३९] असे तिरस्काराचे उद्गार मुक्ताबाईच्या तोंडून निघतात.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सरकारनं हरिजनांच्या गृह रचना संस्थांना बिन व्याजी वीस वर्षांच्या मुदतीने सरकारी कर्ज व फुकट जागा देण्याचे जाहिर केले. या योजनेचा या गरीब जनतेस लाभ करुन देण्याचे मुक्ताबाईंनी ठरविले पण हे काम किचकट लागणारे आहे. या योजनेत समंजसवृत्ती दाखविणारी माणसे हवीत असे त्याना वाटू लागले. याचवेळी सोलापूरच्या गिरणी कामगाराना बोनस मिळणार हे समजताच मुक्ताबाई तेथे गेल्या आणि या योजनेत त्याना पैसे गुंतविण्यासाठी सांगितले. त्यांना ही योजना पटवून दिली. लोकांनी विश्वास दाखवून पैसेही दिले. मुक्ताबाईंनी लगेच संस्था रजिस्टर करुन घेतली.यावेळी त्यांना अनेक आपत्तीना तोंड द्यावे लागले. अनेक कागदपत्रे,ठराव,वगैरे जोडून संस्था रजिस्टर केली. सिटीसर्वे ऑफिसमध्ये जाऊन ज्या जागांना पूर्वी कुणाची मागणी नाही अशी जागा निवडली. जागा मिळाली पण यात एक खंत होती की,ही जागा लोकांच्या कामाच्या ठिकाणापासून फारच दूर होती.

कर्ज मिळविण्यासाठी खटपट सुरु झाली. जी.आर.मध्ये दिलेल्या योजने प्रमाणे घरे बांधण्यास शहरामध्ये दोन हजार व खेड्यात पंधराशे रुपये मिळणार होते. पण इतक्या रकमेत त्यांच्या योजनेप्रमाणे घरे बांधून होणार नाहीत असे लेखिकेने मागास वर्गाचं खातं ज्यांच्याकडं होतं त्या तपासे साहेबांना सांगितलं.व या रकमेत वाढ करुन मिळावी असे सुचविले. आणि असे नाही केल्यास ब-याच अडचणी उद्भवणार असे पटवून म्हणाल्या,तुम्ही जी.आर.बदलून घ्या,नाही तर अर्धवट बांधलेली घरं वा-यावावटळीची शिकार होतील, सरकारला आणि कार्यकर्त्यांना नामुष्की येईल. ज्या घरात कोणी राहायला गेलं नाही,जी घरं बांधून झालीच नाहीत, त्याच कर्ज तरी कोण फेडील ? " [४०] इतक्या अडचणी

सांगूनसुध्दा तपाशी साहेब म्हणाले, " तुम्हाला ते सगळं जी.आर.प्रमाणेच करावं लागेल. आतापर्यन्त अशी तक्रार कुणाचीच नाही. "४१ तेव्हा घरं बांधताना सगळं भाग करुन घेण्यासाठी मोफत श्रमशिबिर करुन घेणेही जमणारे नव्हते.कारण एक दिवस काम चुकवलं तर या लोकांची चूल पेटणार नव्हती. म्हणून ओळखीने नगरपालिकेकडून सगळं ठिकाणी क्वारा टाकून घेतला. डी.एस.पी.साहेबांच्या ओळखीने श्री एकनाथ पिराजी उपलप याना बांधकामाचे कॉन्ट्रॅक्ट दिले. त्यांच्याकडून घरं बांधून घेतली.पण शेवटी एक अडचण निर्माण झाली की जी.आर.मधील योजनेप्रमाणे घरे बांधली नसल्याने शेवटची चौदा हजार रुपयाची रक्कम सहकारी खात्याच्या सचिवानी देण्याच्या वेळी हे प्रकरण रोखलं. शेवटी स्वा. चव्हाण यशवंतराव यांच्या सहकार्यामुळे हे पैसे मिळाले. सर्वांना घरे बांधून मिळाली पण यात मुक्ताबाईंना फार त्रास झाला व अनेक अनुभवही आले. दरम्यानच्या काळात लेखिकेचे बि-हाड साता-याला गेलं पण या घरांच्या उद्घाटनाच्यावेळी लेखिका हजर राहू शकल्या नाहीत.कारण या घर बांधणीच्या प्रकरणामुळे त्या फार जिकीरीस आल्या होत्या. तेव्हा अत्यंत त्रास घेऊन ,यातना भोगून या गरीबांचा विकास व्हावा,त्याना माणसाप्रमाणे जीवन जगता यावे या तीव्र इच्छेने समाज कार्यात स्वत:स झोकून घेणा-या मुक्ताबाईंच्या कार्यास शेवटी का असेना यशाचे फळ आले कारण अजूनही त्या हौसिंग सोसायटीला अडाणी लोक ` मुक्ताबाईची सोसायटी ` म्हणून ओळखतात.

मुक्ताबाईंनी आपल्या आत्मकथनामध्ये स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्यानंतरच्या सामाजिक जीवनाचे दर्शन घडवून तत्कालीन कॉंग्रेस पक्ष व यास पाठींबा व्यक्त करणारे अस्पृश्य वर्गातील लोभी पुढारी यांच्या प्रवृत्तीवर टीका केली आहे. म्हणून आरती कुसरे - कुलकर्णी म्हणतात " जातीयतेशी आपली लढाई आहे" असे सांगत जातीच्या आधारे सवलती मिळवून बडेजाव मिरविणा-यांची त्यांना कीव येताना दिसते. " ४२

सामाजिक प्रश्न घिसाडयासारखे न हाताळता त्याची पार्श्वभूमी समाजावून घेऊनच सोडवायाला हवे याची जाणीव ग्रामीण शिक्षकांना व्हावी म्हणून

मुक्ताबाईंनी शिक्षणखात्याचे डेप्युटी डायरेक्टर आप्पासाहेब पवार यांच्या मदतीने मांजरीच्या ग्रामसेवक ट्रेनिंग सेंटरमध्ये शिबिर आयोजित केले. शिक्षकांचे सामाजिक भान जागृत करण्याची लेखिकेला गरज वाटली म्हणूनच हे शिबिर घडवून आणले. या शिबिरात उन्मार्गाची मुलं, प्रौढ शिक्षण, शिक्षा भोगून सुटून आलेल्या कैद्यांचे प्रश्न, सहकार आणि त्याचे हिशेब, शारीरिक शिक्षण, शेतीविषयक माहिती, अस्पृश्यता निवारण, भिका-यांच्या व वेश्यांच्या प्रश्नावर चर्चा करून शिक्षकांच्या मनात सामाजिक जाणीवा रुजविण्याचा प्रयत्न केला. असेच दुसरे शिबिर बाराबारा मुली व दोन दोन शिकाऊ ग्रामसेवक असे गट पाडून गरिबांच्या झोपडपट्टीत सफाईचा कार्यक्रम केला. त्यांना आरोग्या-बद्दल माहिती दिली. आणि तेथील लोकांची सुखदु:खे समजावून घेतली.

पंचवार्षिक योजना या गरीबांच्या विकासासाठी असतात त्या तळागाळापर्यन्त पोचवाव्या लागतात. गावक-यांच्या मनावर ठसवाव्या लागतात. आणि त्यांचा विकास घडवून आणण्याचा प्रयत्न ग्रामसेवकांनी करावा लागतो. पण या शिबिराच्यावेळी त्यांना या ग्रामसेवककडून आलेल्या कटू अनुभवामुळे लेखिका म्हणतात, "एवढं मोठं, अवाढव्य काम देशाच्या विकास योजनेचं त्याचा शेवटचा दुवा जो ग्रामसेवक तोच फार कच्चा, कुचका आहे. कुजक्या बांबूवर हे भव्य काम उभं आहे. कुणी ग्रामसेवकाचं महत्व ओळखेल आणि तोही अष्टपैलू बनेल तेव्हा सुदिन उगवेल ! नाही तर पंचवार्षिक योजना ख-या अर्थानं तळापर्यन्त झिरपणारच नाहीत."[43] असं पंचवार्षिक योजनाचं महत्व पटवून देवून , या योजना तळागाळा पर्यन्त पसरविणा-या ग्रामसेवकांच्या प्रवृत्तीवर लेखिकेने प्रकाश टाकला आहे.

समाजाने ज्याना स्वत:पासूनच नव्हे तर सर्व मानवी हक्कापासून,दूर ठेवले अशा महारोग्यांची निरपेक्ष वृत्तीने सेवा करणा-या बाबा आमटे यांची भेट घेण्याची इच्छा लेखिकेची झाली.कारण ज्याप्रमाणे अस्पृश्य वर्गाच्या न्याय हक्काची कवाडे, या सवर्ण वर्गाने बंद केली तशीच कवाडे या महारोग्यांच्या

जीवनाची समाजाने बंद केली होती. ती कवाडे उघडण्याचा व त्यांना स्वाभिमानाने जगण्याचा मार्ग दाखवून देणाऱ्या बाबा आमटे व साधनाताई यांची भेट घेण्याची इच्छा मनात निर्माण होणे साहजिकच होते. त्यांच्या या कार्याबद्दल लेखिकेच्या अंत:करणात सहानुभूती निर्माण झाली. त्यांच्या आनंदवनात जाऊन त्या रोग्यांची सुखदु:खे समजावून घेतली. त्यांचे आनंदी जीवन पाहून अगदी भारावल्या अंत:करणाने मुक्ताबाई म्हणतात, " महात्मा फुल्यांनीही अशीच छिन्नी हातोडा हाती घेऊन समाजमूर्ती घडवली. अस्पृश्यतेच्या नावाखाली ज्यांना समाजाची कवाडे मिटलेली होती त्यातलेच जवळ जवळ निम्मे पेशंट इथे आहेत ! समाजाची मिटलेली कवाडं तोडण्याचा प्रयत्न करण्यात महात्मा फुले श्रमून गेले, महर्षि कर्वे थकून गेले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर अमर होऊन गेले आणि पूज्य बाबा आमटे ? बाबा तर येशू ख्रिस्त म्हणून प्रकाशात आहेत ! "[४४] असा बाबा आमट्यांच्या कार्याचा गौरव करून त्यांना थोर समाज सेवकाच्या रांगेत नेऊन बसविले. मुक्ताबाई केवळ हौस म्हणून समाज सेवा करत असताना त्याना आलेले अनुभव त्यांनी अगदी प्रांजळपणे मांडलेले आहेत. त्याच्या अनुभवकथनाविषयी यदुनाथ थत्ते म्हणतात, " राजर्षि शाहू महाराज,डॉ.बाबासाहेब आंबेडकर , कर्मवीर भाऊराव पाटील, विठ्ठलरामजी शिंदे, बाबा आमटे, साधनाताई आमटे इत्यादिंच्या कार्याबद्दल त्यांच्या अंत:करणात कृतज्ञता आहे. त्यांच्यामुळेच आपल्या अनुभवांचे कथन करण्याची इच्छा त्यांच्या मनात बळावली. "[४५] असे लेखिकेच्या प्रांजळपणाचे व त्यांच्या भावनांचे योग्य दर्शन त्यानी यातून घडविले आहे.

३) ` मिटलेली कवाडे ` शीर्षकाचा आशयगर्भ ---

आत्मकथनांच्या कलात्मकतेचा विचार करताना प्रथम त्यांची प्रतिकात्मक व बोलकी शीर्षके वाचकांचे लक्ष आपल्याकडे वेधून घेतात. ही शीर्षके आत्मकथनां - च्या आशयाचे सूचन करणारी असतात.त्यातून लेखनांतर्गत असलेले भावनिक व वैचारिक आशयाचे पदर सूचित होत असतात. त्यातून लेखकाचे निर्व्याज मन

आपल्या डोळ्यासमोर उभे राहते. आणि मनाला अस्वस्थ करणाऱ्या त्यांच्या आठवणी व अनुभव वाचकास विचारप्रवृत्त करतात.

' मिटलेली कवाडे ' हे मुक्ता सर्वगोड यांच्या आत्मकथनाचे नाव असेच आशयगर्भ आहे. हजारो वर्षांपासून सवर्णांनी अस्पृश्य वर्गाच्या न्याय हक्काची पायमल्ली करुन त्याचे जीवनच एका दु:खाच्या डोहात ढकलून दिले होते . त्यांना पशुतुल्य मानून अगदी हीन स्वरुपाची वागणूक दिली गेली. त्याना स्वत:पासूनच नव्हे तर त्यांच्या मानवी जीवनापासून दूर ठेवले होते. अशा या दलित समाजाची ज्ञान, सुख, समृध्दी यांची मिटलेली कवाडे उघडण्याचा प्रयत्न म.फुले, डॉ.आंबेडकर यांनी केला. तरी सुध्दा या दलित समाजाच्या वाट्याला कधी सवर्णांमुळे तर कधी स्व-जातीतील पुढाऱ्यांच्या लोभीपणामुळे पावलोपावली या ना त्या रुपाने कवाडे मिटलेली दिसतात. लेखिकेनेही आपल्या परीने ही कवाडे उघडण्याचा प्रयत्न केला आहे. कधी जातीचा, कधी उच्चनिचतेचा तर कधी परंपरेचा आधार घेऊन सवर्णांनी छळलेला तर श्रीमंतीचा व स्वत:च्या ज्ञानाचा वापर करुन अस्पृश्य वर्गातीलच पुढाऱ्यानीही या अस्पृश्यांना दु:ख देण्याचा त्यांचा छळ करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या नशिबी माणुसकीपणाचे जीवन आणू न देता केवळ समाजाचा दास म्हणून वागविले आणि त्यांच्या जगण्याची, न्यायहक्काची कोंडी करुन ठेवली या अर्थानेच मुक्ताबाईंनी ' मिटलेली कवाडे ' या शीर्षकाची योजना केली आहे. ही अस्पृश्य वर्गाच्या दु:खात लोटलेल्या, पशुतुल्य वागणूक दिलेल्या जीवनाची कवाड उघडण्याचा व त्यांचा सर्वतोपरी विकास करण्याचा प्रयत्न लेखिकेने केला. यामध्ये त्यांना जे भयंकर अनुभव आले व पावलोपावली त्यांच्या कार्यात जी विघ्ने आणली गेली त्यांना न जुमानता लेखिका जिद्दीने पुढे गेल्या आहेत. एकप्रकारे आंबेडकरानी निर्माण केलेल्या सामाजिक क्रांतीला त्यानी हातभारच लावला आहे. यावरुन जुनी समाज व्यवस्था उलथून पाडून नवीन समतावादी समाज रचना निर्माण करण्याची त्यांची मनीषा दिसून येते. तेव्हा मुक्ताबाईंनी आपल्या समाज कार्याच्या रुपाने या अस्पृश्य वर्गाच्या

नशिबी आलेली मिरलेली कवाड उघडण्याचा प्रयत्न केला व आता यापुढे ही मिरलेली कवाड राहणार नाहीत अशी आशाही व्यक्त केलेली आहे.

समारोप ---

मुक्ताबाईनी जे कांही सामाजिक कार्य केले त्यामागे दलित समाजाचा व मुख्यत्वे करुन दलित स्त्रीयांच्या विकास घडवून आणणे हा हेतू होता. आणि त्यामुळे ग्रामीण व शहरी जीवनात जमेल तसे त्यांनी कार्य केले. तत्कालिन स्त्री जीवनाकडे पाहिले असता ती कौटुंबिक जीवनामध्ये पतीच्या वर्चस्वाखाली तर सामाजिक जीवनामध्ये भोंदूगिरी करणाऱ्या पुढाऱ्यांच्या वर्चस्वाखाली होती. यास कारण होते ते त्या स्त्रीचं अज्ञान. तेव्हा या दलित स्त्रीच्या व एकंदरीत दलित समाजाच्या ठिकाणी असलेले अज्ञान दूर करुन त्यांच्यात जागृतीवस्था निर्माण करण्यासाठी मुक्ताबाईनी प्रौढ शिक्षणाचा मार्ग स्वीकारला. महिला मंडळांच्या कार्याची दिशा समजावून सांगितली. आणि या गरीब स्त्रियांना स्वतःच्या पायावर उभे राहता यावे यासाठी शिवणवर्ग, भरतकामासारखे मार्ग सुचविले. तर अर्धवट शिक्षण करुन फिरणाऱ्या मुलांच्यामध्ये कामप्रवृत्ती निर्माण करण्यासाठी कारखान्यातील यंत्रांचे प्रदर्शन घडवून आणले. एकंदरीत या वर्गाची सामाजिक व मानसिक दास्यातून मुक्तता व्हावी यासाठी मुक्ताबाई अखेर पर्यन्त धडपडत होत्या.

देश स्वतंत्र झाला तरी अस्पृश्यांच्या सामाजिक जीवनामध्ये फारसा बदल झालेला नव्हता. तेव्हा मुक्ताबाईनी अनेक सभा संमेलनातून या वर्गाची कैफियत मांडली. आणि श्रमविभागणीच्या तत्वातून या लोकांच्या नशिबी आलेले सामाजिक दु:ख ,आर्थिक व सामाजिक शोषण पाहून या बलुत्याच्या व सामाजिक विषमतेच्या जाळ्यातून सुटका करुन घेण्यासाठी त्या मार्गही सुचवतात. यातून मुक्ताबाईची विचारसरणी मार्क्सवादाला जवळची असलेली पाहावयास मिळते. कारण मार्क्सवादास वर्गविरहीत, शोषणरहित आणि नवा समताधिष्ठीत समाज निर्माण करावयाचा होता. तेव्हा अशा समाजाच्या स्थापनेसाठीच मुक्ताबाईसुध्दा

घडपडत होत्या. म्हणून त्यांच्या आत्मकथनातून एका बाजूने आर्थिक संघर्षाला तोंड देत नव्या अस्तित्वाचा शोध घ्यावयाचा आहे आणि जुन्या अन्यायांना संपवायचे आहे असाच मार्क्सवादाने मान्य केलेला विचार मुक्ताबाईंना सांगावयाचा आहे हे मान्य करावे लागते.

## संदर्भ सूची


१ मुक्ता सर्वगोड - मिटलेली कवाडे चेतश्री प्रकाशन, अमळनेर, प्रथमावृत्ती - ५ नोव्हेंबर, १९८३. — प्रस्तावना

२ प्रा.डॉ.सौ.आरती कुसरे - कुलकर्णी - दलित स्वकथने विजय प्रकाशन, सीताबर्डी, नागपूर, प्रथमावृत्ती - ३ जानेवारी, १९९१. — पृ.१४९

३ - तत्रैव - — पृ.३६.

४ मुक्ता सर्वगोड - उ.नि. — पृ.४०.

५ - तत्रैव - — पृ.४०.

६ - तत्रैव - — पृ.४९.

७ - तत्रैव - — पृ.६१.

८ - तत्रैव - — पृ.६१.

९ - तत्रैव - — पृ.६२.

१० गो.म.कुलकर्णी - मराठी साहित्यातील स्पंदने सुवर्ण प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती - १५ ऑगस्ट, १९८५. — पृ.१३२.

११ मुक्ता सर्वगोड - उ.नि. — पृ.६७.

१२ - तत्रैव - — पृ.६८.

१३ - तत्रैव - — पृ.६८.

१४ मुक्ता सर्वगोड - मिटलेली कवाडे, चेतश्री प्रकाशन, अमळनेर, प्रथमावृत्ती - ५ नोव्हेंबर, १९८३. पृ.७५.

१५ - तत्रैव - पृ.७६.

१७ - तत्रैव - पृ.९९.

१८ - तत्रैव - पृ.१००.

१९ गो.म.कुलकर्णी - दलित साहित्य : प्रवाह आणि प्रतिक्रिया प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती - १३-१-१९८६. पृ.१६.

२० मुक्ता सर्वगोड - उ.नि. पृ.१०२.

२१ - तत्रैव - पृ.१०४.

२२ - तत्रैव - पृ.१०४.

२३ - तत्रैव - पृ.१०७.

२४ - तत्रैव - पृ.१०७.

२५ - तत्रैव - पृ.११०.

२६ - तत्रैव - पृ.११०.

२७ - तत्रैव - पृ.११०.

२८ - तत्रैव - पृ.१११.

२९ - तत्रैव - पृ.११२.

३० प्रा.डॉ.सौ.आरती कुसरे - कुलकर्णी - दलित स्वकथने - उ.नि. पृ.७९.

३१ मुक्ता सर्वगोडे - मिटलेली कवाडे, चेतश्री प्रकाशन, अमळनेर, प्रथमावृत्ती - ५ नोव्हेंबर, १९८३. पृ.११३.

३२ - तत्रैव - पृ.११८.

३३ - तत्रैव - पृ.११८.

३४ - तत्रैव - पृ.१२२.

३५ - तत्रैव - पृ.१२८.

३६ - तत्रैव - पृ.१२८.

३७ - तत्रैव - पृ.१२८.

३८ - तत्रैव - पृ.१३०.

३९ - तत्रैव - पृ.१३०.

४० - तत्रैव - पृ.१३९.

४१ - तत्रैव - पृ.१३९.

४२ प्रा.डॉ.सौ.आरती कुसरे-कुलकर्णी - दलित स्वकथने विजय प्रकाशन, सीताबर्डी, नागपूर, प्रथमावृत्ती - ३ जानेवारी, १९९१. पृ.७९.

४३ मुक्ता सर्वगोडे -- उ. नि. पृ.१५०.

४४ - तत्रैव - पृ.१६१.

४५ - तत्रैव - प्रस्तावना.